नि.फौ.ख.क्र. २८५/२०२४
सरकार वि. रामदास
नि.क्र.२६.

सरकारतर्फे **साक्षदार क्रमांक २** यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
**नाव - भोजराज रामभाऊ धोटे**
वय - ४३ वर्ष, व्यवसाय – शेती,
राहणार – किरनापूर, ता. मौदा, जिल्हा - नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. बी. एम. भगत मार्फत**

**१.** मी न्यायालयातील हजर आरोपीला ओळखतो. दि.२१.०७.२०२४ रोजी पोलीसांनी मला पंचनामाकरीता समंस दिले नव्हते. साक्षीदार सांगतो की, पोलीस त्यांना सोबत घेऊन गेले होते. पोलीस मला फिर्यादीच्या शेतात घेऊन गेले होते व तेथे त्यांनी फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे पंचनामा लिहीला.

**२.** आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. सदर घटनास्थळ पंचनामावर माझी सही अनुक्रमांक १ वर असून त्यातील मजकूर मला माहित नाही. सदर घटनास्थळ पंचनामावरील सहीला **निशाणी क्र.२७** देण्यात येत आहे.

**साक्षीदार सर तपासात सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उलट तपास सदृश प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली परवानगी देण्यात आली.**

**३.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व फिर्यादीची शेती एकमेकांना लागून आहे.हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यावर मी वाचून सही केली होती. हे म्हणणे खरे नाही कि, आरोपी माझा परिचीत असल्याकारणाने मी पंचनामा न वाचता त्यावर सही केल्याचे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. एम. जी. आखरे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष,

मौदा. स्वा/-
दिनांक. ३१.०१.२०२६ **(एन.के. वानखडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मौदा.